महाराष्ट्र शासन
सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक
चेहेडी (बु),सामनगांव रोड, नाशिक रोड,नाशिक - ४२२ १०१
दुरध्वनी क्रमांक . (०२५३) २४६१४७९
ई मेल ronashik@dtemaharashtra.gov.in
स्थंकेतस्थळ - www.dtensk.org

जा.क्रं.तंशि/विकाना/तांशा/२०२१/ 1884 दिनांक - 22 SEP 2021

प्रति,
प्राचार्य,
शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित
पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,
नाशिक विभाग, नाशिक.

विषय - उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेंतर्गत सन २०२१-२२ करिता विद्यार्थ्यांकडुन अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत...

संदर्भ - मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क. १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२१/६३, दिनांक २१.०९.२०२१.

उपरोक्त संदर्भीय पत्राचे अवलोकन करावे, उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहिर करण्यात आलेली आहे. सदर योजनेची माहिती जास्तीत जास्त विद्यार्थ्यी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातुन खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. सर्व इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांचा वापर करुन या योजनेस व्यापक प्रसिध्दी द्यावी.
२. आपल्या कार्यालयाच्या अधिकृत वेबसाईट वरुन सदर योनजेची माहिती व जाहिरात प्रसारित करावी.
३. महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या वॉट्सअप ग्रुप वरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करावी. तसेच संस्थेंतर्गत संचलित सर्व वॉट्सअप ग्रुप व माजी विद्यार्थी संघटनेच्या वॉट्सअप ग्रुप वर सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करण्यात यावी.
४. सर्व माध्यमांकडुन (Social Media) प्रचंड प्रमाणात वापरात येत असलेल्या फेसबुक, इन्स्टाग्राम, यु टयुब, वरुन जाहिरात प्रसारित करावी.
५. सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्या पर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातुन महाविद्यालयाच्या नोटीस बोर्ड व परिपत्रकाव्दारे सदर योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

(ज्ञानदेव पुंडलिकराव नाठे)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक.

प्रत - मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

H:\Tansha२\Desktop_Bakup\All Letter file\Instt Leter.docx

All Deans & HODs (Pl. inform all students)
Prof. Maniyar (For display on institute website)
Prof. Birla K.P. (Social Media)
KN